# सरळसेवा भरती

सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण सांगली यांच्या आस्थापनेवरील व त्यांच्या अधिपत्याखालील विविध शासकीय वसतिगृह व शासकीय निवासी शाळेमध्ये खालील नमूद केलेल्या नियमित शिपाई व शाळेसाठी ठोकवेतन शिपाई  रिक्त पदाच्या सरळसेवा भरतीसाठी पात्र उमेदवाराकडून सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण विहित नमुन्यात दि.26/09/2014 संध्याकाळी 5.45 वाजेपर्यंत या कार्यालयात पोहचतील असे अर्ज मागविण्यात येत आहेत. उमेदवारांची निवड शैक्षणिक अर्हतेच्या लेखी परीक्षेद्वारे करण्यात येईल. परीक्षेची रुपरेषा वेळापत्रक, परीक्षा केंद्र, प्रवेशपत्र, बैठक क्रमांक इत्यादी बाबतची माहिती सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण सांगली डॉ. बाबासाहेब  आंबेडकर सामाजिक न्याय भवन सांगली यांचेकडे राहील.

## रिक्त पदाचा तपशील

| अ क्र | पदाचे नांव | एकूण पद | अ.जा | अ.ज. | विजा (अ) | भ.ज. (ब) | भ.ज (क) | भ.ज.( ड ) | वि.मा .प्र | इ.मा.व. | शैक्षणिक आणि सामाजिकदृष्टया मागास प्रवर्ग | अल्पसंख्याक मुस्लीम | खुला |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | **शिपाई (नियमित वेतन )** | 16 | 0 | 1 महिला<br>1 इतर<br>1 खेळाडू | 1 इतर | 1 महिला | 0 | 0 | 1 इतर | 1 माजी सैनिक<br>1 अंशकालीन | 1 महिला<br>1 प्रकल्प ग्रस्त<br>1 माजी सैनिक | 1 इतर | 1 महिला अपंग<br>1 महिला<br>2 माजी सैनिक |
| | एकूण | 16 | 0 | 03 | 01 | 01 | 0 | 0 | 01 | 02 | 03 | 01 | 04 |
| 2 | **शिपाई (ठोकवेतन)** | 11 | 2 इतर | 0 | 1 इतर | 1 इतर | 0 | 0 | 0 | 1 प्रकल्पग्रस्त<br>1 इतर | 1 माजी सैनिक<br>1 महिला | 1 इतर | 1 माजी सैनिक<br>1 अंशकालीन |
| | एकूण | 11 | 02 | 0 | 01 | 01 | 0 | 0 | 0 | 02 | 02 | 01 | 02 |

## पदांच्या वेतन व शैक्षणिक अर्हताबाबतचा तपशील

| अ.क्र | पदाचे नांव | वेतनश्रेणी | शैक्षणिक अर्हता व पात्रता |
|---|---|---|---|
| 1 | शिपाई  नियमित वेतन | रु. 4440-7440 ग्रेड वेतन-1300 | इ. 4 थी उत्तीर्ण |
| 2 | शिपाई दरमहा ठोकवेतन | रुपये 1700<br>पहिल्या तीन वर्षासाठी  ठोकवेतन त्यानंतर नियमानुसार मागील तीन वर्षाचे कामाचे मुल्यमापन विचारात घेवून तीन वर्षानंतर  नियमित वेतनश्रेणीमध्ये रुपांतरीत | इ. 4 थी उत्तीर्ण |

सदरची जहिरात व विहित अर्जाचा नमुना, सर्वसाधारण अटी शर्ती  मा. जिल्हाधिकारी सांगली यांचे कार्यालयाच्या www.sangli.nic.in या संकेतस्थळावर व सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण कार्यालय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, जुना बुधगांव रोड, सांगली येथे  कार्यालयीन वेळेत उपलब्ध होईल.

टिप :-

**अ):-** समांतर आरक्षणामध्ये पात्र उमेदवार उपलब्ध न झालेस सदर पदे त्या त्या प्रवर्गातील सर्व साधारण (इतर) उमेदवारामधून शासन नियमानुसार भरण्यात येतील.

**ब )** निवड यादीमध्ये नांव असले तरी नियुक्तीबाबत हक्क सांगता येणार नाही.

**क)** ज्या पदाच्या बाबतीत कोर्ट केसेस प्रलंबित आहेत. त्यांचेबाबतीत कोर्टाच्या निर्णयाच्या अधीन राहून निवड करण्यात येतील.

**ड)** अतिरिक्त संवर्ग कक्षाकडून, अंतर जिल्हा बदली किंवा इतर कारणाने उपरोक्त दर्शविलेली पदसंख्या / आरक्षण यात बदल होवू शकतो. त्यामुळे निवड यादीमध्ये नांव असले तरी नियुक्ती देणे बंधनकारक असणार नाही.

**महत्वाच्या सुचना :-**

उमेदवारांनी सदर जाहिरातीत नमूद केलेला अर्ज परिपुर्ण भरुन आवश्यक त्या ठिकाणी फोटो लावून आवश्यक त्या कागदपत्राच्या सत्यप्रती जोडून स्वाक्षरी करुन सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण कार्यालय, सांगली डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, सांगली यांचे कार्यालयात आणून दयावेत. अर्ज परिपुर्ण असला तर स्वीकारला जाईल. परिपुर्ण भरलेले अर्ज हे शासकीय सुट्टीचे दिवस वगळून स. 10.30 ते सायं. 5.45 वाजेपर्यंत विहित मुदतीत अखेर स्वीकारले जातील. तद्नंतर अर्ज स्वीकारले जाणार नाहीत. यापुर्वी समाज कल्याण कार्यालयाकडे नोकरी मागणी केलेले सर्व अर्ज निकाली काढण्यात येत आहेत. याची विशेष नोंद घ्यावी. पोस्टाद्वारे, स्पीड पोस्ट, कुरियर याद्वारे जाहिरात प्रसिध्द झालेपासून विहित मुदतीत म्हणजेच अर्ज स्वीकारण्याच्या अंतिम तारेखेपर्यंत कार्यालयीन वेळेत सायं. 5.45 वाजेपर्यंत या कार्यालयाकडे प्राप्त होणारे अर्ज स्वीकारले जातील. अपुर्ण प्राप्त झालेला अर्ज पुढील कार्यवाहीसाठी ग्राहय धरला जाणार नाही. परीक्षा शुल्क नापरतावा राहील.

**1.परीक्षा शुल्क**

**खुला प्रवर्गासाठी रु.200/- व राखीव प्रवर्गासाठी रु.100/- असे परीक्षा शुल्क राहील.** विहित परीक्षा शुल्काप्रमाणे कोणत्याही राष्ट्रीयकृत बँकेचा व सांगली येथे देय असलेला रेखांकित धनाकर्ष सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण,सांगली यांचे नांवे काढून अर्जासोबत जोडणे बंधनकारक राहील. सदर धनाकर्षापाठीमागे उमेदवाराचे संपूर्ण नांव व पत्ता व कोणत्या पदासाठी (एका पदासाठी स्वतंत्र अर्ज करणे बंधनकारक राहील)अर्ज केलेला आहे ते पद लिहावे. **माजी सैनिकांना अर्जासोबत परीक्षा शुल्क भरणेची अट लागू नाही**

**2.वयोमर्यादा**

उमेदवारांची वयाची किमान व कमाल मर्यादा ही त्यापदासाठी अर्ज सादर करावयाच्या शेवटच्या दिनांकास परीगणित करणेत येईल.

**अ.**सर्व पदासाठी वयाची अट किमान 18 वर्षे व कमाल 33 वर्षे आणि मागासवर्गीय उमेदवारांसाठी 38 वर्षे राहील.

**ब.** अपंग,स्वातंत्र नामनिर्देशित पाल्य,सन 1991 चे जनगणना कर्मचारी,सन 1994 नंतरचे निवडणूक कर्मचारी,प्रकल्पग्रस्त,भूकंपग्रस्त यांचेसाठी वयोवर्षे 45 पर्यंत शिथिलक्षम राहील.

**क.** सुशिक्षित बेरोजगार अर्थसहाय्य या योजनेअंतर्गत शासकीय कार्यालयामध्ये 3 वर्षापर्यंत दरमहा मानधनावर काम केलेल्या व रोजगार मार्गदर्शक केंद्रामध्ये या अनुभवाची नोंद केलेल्या पदवीधर/पदवीकाधारक अशंकालीन उमेदवारांना वयोमर्यादा 46 वर्षापर्यंत शिथिलक्षम राहील.

**ड.** खुल्या प्रवर्गातील खेळाडूसाठी वयोमर्यादा 38 वर्षे व मागासवर्गीय खेळाडूसाठी वयोमर्यादा 43 वर्षापर्यंत शिथिलक्षम राहील.

**इ.** संरक्षण दलात 6 महिन्यापेक्षा जास्त सेवा केलेल्या माजी सैनिकांच्याबाबतीत त्यांनी केलेली एकूण सेवा अधिक तीन वर्षे इतका कालावधी शिथिलक्षम राहील व विकलांग माजी सैनिकांसाठी वयोवर्षे 45 पर्यंत शिथिलक्षम राहील.

**फ.**आ.सेवक (म)पदासाठी कमाल वयोमर्यादा 40 व मागासवर्गीय उमेदवारांसाठी 05 वर्षे शिथिलक्षम राहील.

## 3.अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे :-

उमेदवारांनी त्यांच्या दाव्याच्या पुष्ठयर्थ खालीलप्रमाणे कागदपत्रे अर्जासोबत जोडणेत यावी.

1.स्वत:चा पत्रव्यवहाराचा पत्ता लिहलेला 8*4 इंचाचा लिफाफा ज्यावर रु5/- चे पोस्टेज टिकिट चिटकविलेले असावे

2.शैक्षणिक अर्हता,

3.वयाचा पुरावा (शाळा सोडल्याचा दाखला किंवा दहावीचे प्रमाणपत्र इ.),

4.जातीचा दाखला,

5.डोमोसाईल प्रमाणपत्र,

6.उन्नत व प्रगत गटात मोडत नसलेबाबतचे प्रमाणपत्र,अपंगत्वाचा दाखला,माजी सैनिक असलेबाबतचे प्रमाणपत्र,प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र,भूकंपग्रस्त प्रमाणपत्र,खेळाडू असलेचे प्रमाणपत्र,महिलांचे 30 टक्के आरक्षणसाठी वैध असलेले उन्नत व प्रगत गटात मोडत नसलेबाबतचे प्रमाणपत्र,स्वातंत्र सैनिक नामनिर्देशन प्रमाणपत्र,पदवी/ पदवीधारकार अंशकालिन कर्मचारी असलेचे प्रमाणपत्र,अनुभवाचे प्रमाणपत्र,नोंदणी प्रमाणपत्र,इत्यादी शासनाने विहित केलेल्या नमुन्यातील सक्षम अधिकारी यांनी दिलेल्या प्रमाणपत्राच्या साक्षांकित छायांकित प्रती अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. अर्जावर चिटकविलेल्या फोटो व्यतिरिक्त स्वत:चा एक स्वतंत्र पासपोर्ट आकाराचा फोटो जोडावा,त्या फोटोपाठीमागे ज्या पदासाठी अर्ज केला आहे ते पद व स्वत:चे पुर्ण नमुद करावे. अर्ज दाखल केल्यानंतर कोणतीही जादा कागदपत्रे स्विकारली जाणार नाहीत.

## 4. प्रवेशपत्र, परीक्षा केंद्र, बैठक क्रमांक इ.बाबत सुचना-

लेखी परिक्षेस बसण्यासाठी उमेदवारांना सदर पदासाठी घेण्यात येणाऱ्या परिक्षेचे प्रवेशपत्र, वेळापत्रक, परिक्षा केंद्र, बैठक क्रमांक इत्यादी बाबतची माहिती सहाय्यक आयुक्त,समाज कल्याण,सांगली यांचे नोटीसबोर्डवर उपलब्ध होईल. परिक्षा प्रवेशपत्र उमेदवारांच्या अर्जात नमूद पत्तावर पोस्टाने पाठविणेत येईल. प्रवेश पत्र न मिळाल्यास सहाय्यक आयुक्त,समाज कल्याण,सांगली यांच्या कार्यालयातुन विहीत मुदतीत म्हणजेच परिक्षेच्या दिनांकापूर्वी उपलब्ध करून घेणेची जबाबदारी उमेदवाराची राहील.

## -: सर्वसाधारण सूचना :-

**1.** उमेदवार हा भारतीय नागरीक असावा व महाराष्ट्र राज्याचा अधिवासी असावा त्याला मराठी भाषेचे ज्ञान असावे. उपरोक्त बाबत शासनाने वेळोवेळी विहीत केलेले सक्षम अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक राहील.

2. शासकीय / निमशासकीय कर्मचाऱ्यांनी त्यांचे अर्ज त्यांचा नियुक्ती प्राधिकाऱ्यांची परवानगी घेवून भरणेचे आहेत. परवानगीची एक प्रत अर्जासोबत जोडावी.
3. उमेदवार एकापेक्षा जास्त पदाकरिता अर्ज करणार असलेस प्रत्येक पदांसाठी विहीत नमुन्यात स्वतंत्र अर्ज करून त्यासोबत आवश्यक त्या प्रमाणपत्राच्या सत्यप्रती जोडण्याच्या आहेत. तसेच प्रत्येक पदांसाठी वेगवेगळे परिक्षा शुल्क भरावे लागेल.मागासवर्गीय प्रवर्गातील पदासाठी अर्ज करताना अर्जासोबत जात प्रमाणपत्र व असलेस जात वैधता प्रमाणपत्र जोडणे बंधनकारक राहील.
4. महाराष्ट्र नागरी सेवा नियम, 1981 मधील तरतुदी व त्यामध्ये वेळोवेळी झालेल्या सुधारणा उमेदवारास बंधनकारक राहतील.
5. सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र.बी.सी.सी.-2011/प्र.क्र.1064/2011/16-ब, दिनांक 12 डिसेंबर 2011 नुसार मागासप्रवर्गाच्या उमेदवारांना त्यांचे जातवैधता प्रमाणपत्र नियुक्ती आदेशाच्या दिनांकापासून 6 महिन्याच्या आत सादर करणेच्या अटीवर व मा. सर्वोच्च न्यायलयाचे आदेशाचे अधिन राहून नियुक्ती दिली जाईल. सहा महिन्यात जात वैधता प्रमाणपत्रासाठी परिपूर्ण प्रस्ताव कार्यालयामार्फत समितीकडे सादर करून वैधता प्रमाणपत्र सादर न केलेसकोणतीही नोटीस न देता सेवा समाप्त करणेत येईल. नियुक्ती दिलेनंतर जात पडताळीचा प्रस्ताव हा संबधित समितीकडे सादर केलेची पोहोच उमेदवाराने कार्यालयास सादर करणे बंधनकारक आहे.
6. प्रकल्पग्रस्त, भूकंपग्रस्त उमेदवारांनी संबधित जिल्यातील जिल्हाधिकारी / जिल्हा पुनर्वसन अधिकारी यांचेकडील प्रकल्पग्रस्त, भूकंपग्रस्त प्रमाणपत्राच्या सत्यप्रती अर्जासोबत जोडण्याच्या आहेत. प्रत्यक्ष निवड झालेल्या उमेदवारांच्या प्रमाणपत्राची पडताळणी झालेनंतरच नियुक्ती बाबत विचार करणेत येईल.
7. अंशकालीन उमेदवारांनी त्याच्या शासकीय अथवा निमशासकीय सेवेतील नियुक्तयामध्ये 3 वर्ष पुर्ण अंशकालीन काम केलेल्या व रोजगार मार्गदर्शन केद्रामध्ये अनुभवाची नोंद केलेल्या सर्व अंशकालीन उमेदवारांनी अनुभव प्रमाणपत्राची सत्यप्रत अर्जासोबत जोडणे बंधनकारक राहिल
8. अपंग आरक्षणातुन लाभ घेणा-या उमेदवारांनी किमान 40% अपंग असल्याबाबत जिल्हा शल्य चिकित्सक किंवा शासनाकडील तज्ञ वैदयकिय मंडळाने वैदयकिय प्रमाणपत्राची सत्यप्रत अर्जासोबत जोडणे बंधनकारक आहे तसेच अपंग आरक्षणातुन निवड केलेल्या उमेदवारांना शासनाने नियुक्त केलेल्या तज्ञ वैदयकिय मंडळाने तो उमेदवार निवड केलेल्या पदावर काम करु शकेल असे प्रमाणपत्र दिलेवरच नियुक्ती देण्यात येईल. अपंग उमेदवारांनी लेखी परीक्षेसाठी लेखनिक आवश्यक असल्यास अर्जामध्ये तसे नमुद करावे तसेच सहाय्यक आयुक्त,समाज कल्याण,सांगली यांचे नावे परीक्षा फार्मसोबत लेखनिक मिळणेसाठी स्वतंत्र अर्ज जोडावा लेखनिक पुरविण्याबाबतच्या अर्जावर शासन निर्णयप्रमाणे निर्णय घेण्यात येईल.
9. महाराष्ट्र शासन सामाजिक न्याय व विशेष सहाय विभागाकडील शासन परीपत्रक क्र. सीबीसी-2012/प्र.क्र. 182/विजाभज-1 दि. 25.03.2013 नुसार विमुक्त जाती भटक्या जमाति इतर मागास प्रवर्ग आणि विशेष मागास प्रवर्गातील आरक्षणाचा लाभ मिळणेसाठी सन 2013-14 या आर्थिक वर्षाचे (दि. 31.03.2015 पर्यत वैध असणारे (नॉनक्रिमिलेअर)) उन्नत व प्रगत गटामध्ये मोडत नसल्याचे प्रमाणपत्र अर्जासोबत सादर करणे बंधनकारक राहिल. अन्यथा अर्ज अपात्र ठरविण्यात येईल.
10. महिलांचे आरक्षाबाबत शा.नि.महिला व बालकल्याण विभागाकडील क्र. 82/2001/मसेआ-2000/प्र.क्र. 415/ का-2 दि. 25 मे 2001 मधील तरतुदीनुसार राहिल सन 2013-14 या आर्थिक वर्षाचे दि. 31.03.2015 पर्यत वैध असणारे (नॉनक्रिमिलेअर) उन्नत व प्रगत गटामध्ये मोडत नसल्याचे प्रमाणपत्र अर्जासोबत सादर करणे बंधनकारक राहिल.

11.महाराष्ट्र शासन सामाजिक न्याय व विशेष सहाय विभागाकडील शासन क्र. सीबीसी-2010/2013/प्र.क्र. 35/मावक दि. 15 जुलै 2014 रोजीच्या शासन निर्णयासोबत जोडलेल्या जातीचा दाखला या नमुन्यात राज्यात शैक्षणिक व सामाजिक दृष्टया मागासप्रवर्ग (शै.सा.मा.प्र.) Eductional & social Backward Category (ESBC) असलेबाबत सक्षम प्राधिका-याचे प्रमाणपत्राचे साक्षांकित प्रती जोडाव्यात. तसेच सदरचे आरक्षण उन्नत व प्रगत (क्रिमीलिअर) घटकांना लागु होणार नाही त्यामुळे संबंधित उमेदवारांनी सन 2013-14 या आर्थिक वर्षाचे 31.03.2015 पर्यंत वैध असणारे (नॉनक्रिमिलेअर) उन्नत व प्रगत गटामध्ये मोडत नसल्याचे प्रमाणपत्र अर्जासोबत सादर करणे बंधनकारक राहिल अन्यथा अर्ज अपात्र ठरविण्यात येईल.

12.महाराष्ट्र शासन सामाजिक न्याय व विशेष सहाय विभागाकडील शासन क्र. सीबीसी-2010/2014/प्र.क्र.131/ मावक दि. 22 जुलै 2014 च्या शासन निर्णयासोबत जोडलेल्या जातीचा दाखला या नमुन्यात राज्यात विशेष मागास प्रवर्ग (अ) या प्रवर्गातील मुस्लीम समाजास जात प्रमाणपत्र व वैधता प्रमाणपत्र असलेबाबत सक्षम प्राधिका-याचे प्रमाणपत्राच्या साक्षांकित प्रती जोडव्यात तसेच महाराष्ट्र शासन अल्पसंख्याक विकास विभागाकडील शासन निर्णय क्र. आविवि/2014/प्र.क्र. 81/ का-7 दि. 19 जुले 2014 नुसार सदरचे आरक्षण उन्नत व प्रगत (क्रिमीलिअर) घटकांना लागु होणार नाही त्यामुळे संबंधित उमेदवारांनी सन 2013-14 या आर्थीक वर्षाचे दि.31/3/2015 पर्यत वैध असणारे (नॉन-क्रिमीलेअर) उन्नत व प्रगत गटामध्ये मोडत नसलेचे प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील. अन्यथा अर्ज अप्राप्त ठरविण्यात येईल.

13.सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय दि.1जुलै 2005 नुसार लहान कुंटुंब असल्याचे विहित नमुन्यातील प्रमाणपत्र अर्जासोबत सादर करणे आवश्यक राहील.

14.नैसर्गिक आपत्तीमुळे विहित दिनांकास लेखी परिक्षा घेणे शक्य नसेल तर कार्यालय ठरविल त्याप्रमाणे सोईच्या दिवशी लेखी परिक्षा घेण्यात येईल.याबाबत वर्तमानपत्रातुन जाहिरातीद्वारे प्रसिध्दी देण्यात येईल.

15.उमेदवारांने विहित अर्हता धारण केली परंतु अर्ज अपूर्ण अथवा चुकीचा भरला असल्यास लेखी परिक्षेला बोलविण्याचा/बसण्याचा हक्क प्राप्त झाला असे नाही.

16.शासन परिपत्रक क्र.पी.आर.ई.2004/3855/प्राशि 1.1 दि.2 जून 2005 नुसार माजी सैनिक या समांतर आरक्षणामध्ये युध्द काळात व युध्द नसताना सैनिक सेवेत मृत्यू झालेल्या किंवा अंपगत्व येवून नोकरीसाठी अयोग्य झालेल्या माजी सैनिकांच्या कुंटुंबातील फक्त जवानांची पत्नी किंवा अंपग जवानाची पत्नी यांना नियुक्ती देण्याचे धोरण आहे.त्यानंतर त्याची अविवाहित मुलगी/ अविवाहित मुलगा यांचा समावेश आहे व त्यांचा 15 % समांतर आरक्षणातून विचार करण्यात येईल.

17.अत्युच्य गुणवत्ताधारक खेळाडुसाठी असलेले आरक्षण व वयोमर्यादेच्या शिथिलतेबाबत शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रिडा विभाग क्र.रक्रिधो-2000-प्र.क्र-68-क्रियुसे-2 दि.30 एप्रिल 2005 मधील तरतुदीनुसार खेळाडुसाठी राखीव असलेल्या पदावर निवडीसाठी अर्हता पुढीलप्रमाणे असले.सदर पदासाठी त्या खेळाच्या वैयक्तिक अथवा सांघिक क्रिडा स्पर्धामध्ये किमान राज्य अंजिक्यपद स्पर्धेत प्रथम,व्दितीय,तृतीय स्थान प्राप्त करणारा किंवा सुर्वण,रौप्य किंवा कास्य पदक प्राप्त करणारा खेळाडू.राज्य अंजिक्य स्पर्धा या सदर खेळाच्या महाराष्ट्र ऑलंपिक असोसिएशनशे सलग्न असलेल्या अधिकृत राज्य संघटनेने आयोजित केलेल्या असाव्यात.अथवा महाराष्ट्र ऑलंपिक असोसिएशने स्वत: आयोजित केलेल्या असाव्यात.वैयक्तिकरित्या किंवा आंतत्रित स्वरूपाच्या स्पर्धामध्ये भाग घेतलेल्या खेळाडूचा यासाठी विचार करता येणार नाही.खेळाडूंच्या आरक्षित पदावर नेमणुकीकरीता ज्या खेळाडूंची

निवड होईल.त्याची प्रमाणपत्रे संचालक,क्रिडा व युवक सेवा महाराष्ट्र राज्य पुणे यांचेकडे तपासणीसाठी पाठविण्यात येईल व प्राप्त अहवालानुसार नियुक्ती बाबत विचार करण्यात येईल.

**18.**एखादा उमेदवाराने त्याच्या निवडीसाठी निवड समितीवर प्रत्यक्ष / अप्रत्यक्ष कोणत्याही वेळी दवाब आणल्यास त्यास निवड प्रक्रियेतून वगळण्यात येईल.

**19.**सेवायोजन कार्यालय ,आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय,जिल्हाधिकारी,जिल्हा सैनिक बोर्ड यांच्याकडून शिफारस होणा-या जनगणणा ,अंशकालीन कर्मचारी,प्रकल्पग्रस्त,माजी सैनिक इत्यादी उमेदवाराने त्यांचे शैक्षणिक पात्रतेनुसार जाहिराती प्रमाणे शुल्क भरून विहित पदासाठी व मुदतीत सहाय्यक आयुक्त,समाज कल्याण कार्यालय सांगली यांचेकडे अर्ज करणे बंधणकारक आहे.

**20.**नियमित शिपाई पदासाठी व 03 वर्षे ठोक वेतनाची समाधानकारक सेवा पुर्ण केल्यानंतर ठोकवेतनावरील शिपाईसाठी समामहाराष्ट्र शासन वित्त विभागाकडील निर्णय क्रमांक अनियो/1005/126 सेवा-4 दि.31 ऑक्टोंबर 2005 नुसार दि.1 नोव्हेंबर 2005 नंतर ज्यांची शासकिय सेवेत नियुक्ती होईल त्यांना अंशकालीन परिभाषीत निवृत्तीवेतन योजना लागू राहील.तथापी सध्याची सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना व महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम , 1982 तसेच म.ना.से.(निवृत्तीवेतनाचे अंशराशिकरण) नियम 1984 लागू होणार नाही.

**21.**रिक्त पदाच्या संख्येत कमी जास्त बदल होण्याची शक्यता आहे.त्याबाबत अर्जदाराला कोणताही दावा करता येणार नाही.परिक्षेचा प्रकार,पदांची संख्या,संमातर आरक्षण यात बदल करणे ,परिक्षा स्थगित करणे /रद्द करणे,अंशता बदल इत्यादीबाबतचे सर्व अधिकार सहाय्यक आयुक्त,समाज कल्याण, सांगली स्वत:कडे राखून ठेवतआहे.याबाबत कोणालाही कोणत्याही प्रकारचा दावा सांगता येणार नाही अथवा न्यायालयात दाद मागता येणार नाही.भरती प्रक्रियेच्या कोणत्याही टप्यावर कोणत्याही कारणास्तव उमेदवार अपात्र आढळल्यास त्याच प्रक्रियेतून अपात्र ठरविण्यात येईल.

**22.**उमेदवारांचा गुणवत्ता यादीत अंर्तभाव करण्यासाठी उमेदवारांनी एकूण गुणाच्या किमान 45 % गुण प्राप्त करणे आवश्यक आहे.

**23.**जाहिरातीमध्ये रिक्त पदे ही माहे एप्रिल 2015 अखेर रिक्त होणारी दर्शविलेली असलेली सदरची पदे जस-जशी रिक्त होतील त्यानुसार अंतिम निवड यादीतील जेष्ठतेनुसार नियुक्ती आदेश देण्याची कार्यवाही करण्यात येईल.

**24.**जाहिरातीमधील काही मुद्दे विसंगत असल्यास शासन निर्देश अंतिम राहतील.

**25.**उपरोक्त शैक्षणिक अर्हता व अनुभव किमान अर्हता व अनुभव दर्शवित आहे.

**26.**संपूर्ण भरती प्रक्रियेसंबंधात देखरेख व तपासणी इत्यादीचे अधिकार मा.प्रादेशिक उपायुक्त,समाज कल्याण,पुणे विभाग पुणे यांना राहतील.

**27.**महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्यण क्र.बीसीसी/2013/प्र.क्र354/भाग-2/2013/16-ब दि.24 जुलै 2014 व शा.नि.क्र.बीसीसी-2014/प्र.क्र216-ए/2014/16-ब दि.24 जुलै 2014 अन्वये सुधारित बिदु नामावलीनुसार सदर जाहिरात प्रसिध्द केली आहे.तथापी सुधारित बिंदू नामावली नोंदवही सहाय्यक आयुक्त,मागासवर्ग कक्षाकडून पडताळणीनंतर पद संख्येत बदल होणेची शक्यता आहे.त्यानुसार रिक्त पदे भरण्याची केली जाईल.याची उमेदवारांनी नोंद घेणेची आहे.

(दीपक घाटे)
सहाय्यक आयुक्त
समाज कल्याण,सांगली

| या ठिकाणी उमेदवारांने अलिकडील काळातील आयडेंटी साईज फोटो लावावा व तो राजपत्रित अधिकारी किंवा विशेष कार्यकारी अधिकारी यांचेकडून साक्षांकित करावा |
|---|

# सहाय्यक आयुक्त,समाज कल्याण,सांगली.

## अर्जाचा नमुना

प्रती,

मा.सहाय्यक आयुक्त, (समाज कल्याण)
डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन,
जुना बुधगांव रोड,सांगली.

**पदाचे नांव :- ------------------------------------------**

महोदय,

1) संपूर्ण नांव :- स्वत:चे नांव वडीलांचे/पतीचे नांव आडनांव

2) उमेदवाराचे नांवात बदल असलेस:- ----- ------------------ ----------

3) पत्रव्यवहाराचा संपूर्ण पत्ता :- ----------------- --------------- -------

4) जातीचा प्रवर्ग: (योग्य ठिकाणी (√) अशी खूण करावी) * जात ----------------------

| अनु.जाती | अनु.जमाती | वि.जा.(अ) | भ.ज.(ब) | भ.ज.(क) | भ.ज.(ड) | वि.मा.प्र | इ.मा.व | शैक्षणिक आणि सामाजिकदृष्टया मागास प्रवर्ग | विमाप्र (अ) | खुला |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | |

5) आवश्यक त्या ठिकाणी (√) अशी खूण करावी.

| माजी सैनिक | खेळाडू | प्रकल्पग्रस्त | भूकंपग्रस्त | महिला | अपंग | अंशकालीन |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |

6) अपंगाचा प्रकार (अंध/अल्पदृष्टी,कर्णबधीर,अस्थिव्यंग)------------------------------

7) अपंग उमेदवार लेखनिक आवश्यक आहे/नाही ------------------------------

8) अर्जदाराची जन्मतारीख (अंकामध्ये)(शालांत प्रमाणपत्रामाणे)

| तारीख | महिना | वर्ष |
|---|---|---|
| | | |

9) पदाच्या जाहिरातीनुसार अर्ज स्वीकारणेच्या अंतिम दिनांकास असलेले वय

| तारीख | महिना | वर्ष |
|---|---|---|
| | | |

10) धनाकर्षचा तपशिल :-

धनाकर्ष क्रमांक :------------ दिनांक : / /2014 र.रु.-------- बँकेचे नांव :------- शाखा:---

11) महाराष्ट्र राज्याचे रहिवाशी आहात काय? (डोमिसाईल प्रमाणपत्र जोडणे आवश्यक) होय/नाही

12) अर्जदारा स्त्री आहे कि पुरूष? ------------ * अर्जदार विवाहित आहे कि अविवाहित --------

13) अर्जदाराची शैक्षणिक अर्हता (उत्तीर्ण झालेल्या परीक्षेचा तपशील)

| शैक्षणिक पात्रता | परीक्षा मंडळाचे नांव | उत्तीर्ण होण्याचे वर्ष | एकूण गुण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

14) नांव नोंदणी केलेल्या सेवायोजन कार्यालयाचे नांव :-
नोंदणी क्रमांक ------------------------------------ व दिनांकः / /

15) पूर्वानुभव असल्यास

| अ.क्र | काम केलेल्या कार्यालयाचे नांव | पद | कालावधी | कामाचे स्वरूप |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

वर नमुद केलेला तपशिल माझ्या माहितीप्रमाणे सत्य व अचूक आहे.मी प्रमाणित करतो/करते की,अर्जात नमुद केलेली माहिती खोटी अगर चूकीची आढळून आलेस अर्ज अपात्र करणेस,नोकरी गमाविण्यास व त्या अनुषंगाने होणाऱ्या इतर कार्यवाहीस मी पात्र व बांधील राहीन.

ठिकाण :-

अर्जदाराची स्वाक्षरी

दिनांक :-

अर्जदाराचे संपूर्ण नांव :---------------------

---

**टिप :- जाहिरातीमध्ये पदासाठी विहित केलेल्या शैक्षणिक अर्हता व अटीनुसार आवश्यकतेप्रमाणे कागदपत्राच्या सत्यप्रती,जातप्रमाणपत्र/जात वैधता प्रमाणपत्र असल्यास त्याच्या सत्यप्रती अर्जासोबत जोडाव्यात अन्यथा अर्ज अपात्र ठरविण्यात येईल.**

**महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम 2005 मधील प्रतिज्ञापत्राच्या नमुना-अ**

**प्रतिज्ञापत्र (नियम 4 पहा)**

मी श्री .श्रीमती / कुमारी ------------------------------ श्री -------------------------------- यांचा /यांची/मुलगा/मुलगी/ पत्नी वय------ वर्ष राहणार------------------------------------------ याद्वारे पुढील प्रमाणे असे जाहीर करते /करतो की,

1) मी-------------------- या पदासाठी माझा अर्ज दाखला केला आहे.

2) आज रोजी मला------------- (संख्या) इतकी हयात मुले आहेत.त्यापैकी दि.28 मार्च 2005 यानंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या -------- आहे.(असल्यास जन्म दिनांक नमुद करावा.)

3) हयात असलेल्या मुलांची संख्या दोन पेक्षा अधिक असेल तर दिनांक 28 मार्च 2006 तद्नंतर जन्माला आलेल्या,मुलांमुळे या पदासाठी मी अनर्ह ठरविण्यास पात्र होईन याची मला जाणीव आहे.

ठिकाण:-

दिनांक:- /2014 अर्जदाराची सही

अर्जदाराचे संपूर्ण नाव --------------------